

जन वाचन आंदोलन



जनवाचन आंदोलन हे पुस्तकांना गावागावात घेऊन जाणारे आंदोलन आहे. नवसाक्षर व अर्धशिक्षित लोकांमध्ये पुस्तकांचे सामुदायिक वाचन करणे, ते ऐकणे आणि ऐकवणे हा याचा उद्देश आहे. आज गावातल्या लोकांपर्यंत पुस्तके पोचत नाहीत. त्यांची भाषा त्यांना उमगत नाही आणि किंमती परवडत नाहीत. अशा नववाचकांपर्यंत पुस्तके पोचवण्याचे काम भारत ज्ञान विज्ञान समितीने अंगिकारले आहे. ही पुस्तके प्रसिद्ध लेखकांची आणि सोपी, सुटसुटीत व स्वस्त किंमतीत असावीत असा प्रयत्न आहे.

या आंदोलनातून काय साध्य होईल?

गावागावात जनवाचनाची व जनवाचनालयांची संस्कृती निर्माण होईल. साक्षरता आंदोलनातून हस्तगत केलेली अक्षरकौशल्ये लोक स्वत: विकसित करू शकतील. त्यांच्या ज्ञानविज्ञानाच्या कक्षा विस्तारतील. त्यांच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जाणिवांची पातळी उंचावू शकेल. आपल्या मूलभूत हक्कांच्या आणि एकंदर परिवर्तनाच्या लढ्यासाठी जागृत होऊन ते उभे ठाकू शकतील.




देशातील लोकशाही टिकण्यासाठी आणि अर्थपूर्ण होण्यासाठी हे आवश्यक आहे. साक्षरता म्हणजे केवळ अक्षर ओळख नव्हे तर संपूर्ण जग जाणण्याचे ते कार्य आहे. या दिशेने, गावागावातील लोकांच्या खांद्याला खांदा भिडवून, आम्ही पुढे जाऊ इच्छितो.

भारत ज्ञान विज्ञान समिती
किंमत रु.२-५०

धोंडीराम माणसात आला

त्रिलोक दत्त



भारत ज्ञान विज्ञान समिती

पुस्तकाचे नाव : धोंडीराम माणसात आला
लेखक : त्रिलोक दत्त
मूळ कल्पना : लादू भोगाकी कहानी

संपादन सहाय्य : अमित नारकर,

चित्रकार : अस्लम मुल्ला

प्रकाशन : जानेवारी १९९७
जवाआं/म : दहा

नववाचकांसाठी भारत ज्ञान विज्ञान समिती तर्फे राष्ट्रीय साक्षरता मिशनच्या सहकार्याने देशभर चालवल्या जात असलेल्या 'जनवाचन आंदोलन' मोहिमेसाठी प्रकाशित

मूल्य : २ रुपये ५० पैसे

प्रकाशक / मुद्रक : दत्ता देसाई
राज्य समन्वयक, भारत ज्ञान विज्ञान समिती (महाराष्ट्र),
अक्षय, २१६, केळकर रस्ता, नारायण पेठ, पुणे ४११०३०
फोन : ४५६६९४
मुद्रण स्थळ : महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे ४

अक्षर जुळणी / मांडणी : दिनानाथ मनोहर

धोंडीराम माणसात आला

धोंडीराम वरगावचा एक शेतकरी होता. वरगाव पवना नदीच्या खोऱ्यात डोंगरउतारावरचं गाव. धोंडीराम चार इयत्ता शिकला होता. त्याची थोडी शेती होती. पोटापुरतं पिकत होतं. अडीअडचणीला त्याचा भाऊ चार पैसे पाठवत असे. भाऊ मुंबईत कापडगिरणीत कामाला होता.

धोंडीरामची बायको सरला साक्षर होती. घरात आणि शेतात राबायची. आल्यागेल्याचं व्यवस्थित करायची. साधी, सरळ, कष्टाळू होती. त्यांना एक मुलगा होता. सावळा,चुणचुणीत होता. एक मुलगी व्हावी अशी नवराबायकोची इच्छा होती.

धोंडीराम माळकरी होता. कुणाच्या अध्यात ना मध्यात. काहीजण त्याला कुढ्या स्वभावाचा म्हणत. पंढरीची वारी करायचा. लहर लागली की इतरांना मदत करायचा. कुणाकडं लग्न निघालं तर मदतीला जायचा. एखाद्या घरात कुणी वारलं तर धावून जायचा. गाव त्याला भला माणूस म्हणून ओळखयाचं.

मुंबईचा भाऊ वर्षाकाठी एकदा घरी यायचा.भावाभावांचं एकमेकांवर प्रेम होतं. दोघं मिळून विचार करायचे. जमीन वाढवली पाहिजे. विहीर खोदली पाहिजे. चार पैसे गाठीला ठेवले पाहिजेत. मुंबईचा भाऊ वर्ष-दोन वर्षांत पैसे पाठवणार होता. धोंडीराम शेती वाढवण्यासाठी त्या पैशाची वाट पहात होता.

पण माणूस ठरवतो एक आणि कधीकधी होतं भलतंच. काय झालं? कसं झालं? त्याला कळत देखील नाही. माणूस समजूनही घेत नाही. उताराला लागलेली गाडी थांबवण्याचा प्रयत्नही तो

करत नाही. आणि बघता बघता होत्याचं नव्हतं व्हायची वेळ येते.

धोंडीरामचं असंच झालं.

एके दिवशी त्याचं पोर उठलं रडत. सारखे जुलाब व्हायला लागले. जुलाब काही थांबेनात. पोराचं रडणं थांबेना. औषध म्हणून धोंडीरामनं मुलाला थोडी अफू घातली. पोरं झोपलं. पण जुलाब थांबेनात. धोंडीरामची पळापळ सुरू झाली. भगताकडं गेला. देवाला साकडं घातलं. सरला देवीला नवस बोलली. पण संध्याकाळी पोराला उलटय़ा व्हायला लागल्या. जुलाब तर चालूच होते. मुलानं मान टाकली तशी सरला घाबरली. रडायला लागली. सरलाला रडताना बघून धोंडीरामचं धाबं दणाणलं.

कुणीतरी समजदार माणसानं मुलाला शहरात नेण्याचा सल्ला दिला. डॉक्टरला दाखवा नाहीतर मोठय़ा दवाखान्यात भरती करा म्हणाला. बैलगाडीत बसून हमरस्त्यावर आले. एस्टीची वाट न बघता ट्रक धरला. शहरात आले. अंधार झाला होता. रिक्शा, सिटी बससाठी तास-दीड तास वाट बघितली. पण बस नाही. रिक्शा नाही. नंतर कळलं की गावात दंगा झाला होता. वाहनांची जा-ये बंद पडली होती. धोंडीचा आणि सरलाचा जीव वरखाली होत होता.

शेवटी जवळच्या एका माणसानं चौकशी केली. त्यांना घेऊन तो पोलीस स्टेशनमध्ये गेला. पोलीसांच्या हातापाया पडला. एका पोलीसाच्या हृदयाला पाझर फुटला. त्यानं फौजदाराला विनवलं. पोलीस गाडीतून धोंडीराम मुलासह मोठ्या इस्पितळात पोचला. पण फार उशीर झाला होता. मुलगा हातचा गेला. सरलानं टाहो फोडला. धोंडी उध्वस्त झाला. देवाच्या नावानं बोटं मोडू लागला.

त्यानं गळयातली माळ मोडून फेकून दिली.



मुलाचा मृत्यू धोंडीला सहन झाला नाही. घरात असला की पडून राहायचा. शेतावर जायचं नावच काढायचा नाही. शेतावर गेला तर शून्यात बघत बसून राहायचा. घरी परतायला मनच व्हायचं नाही त्याचं. सरला तर रात्रंदिवस रडायची. मधूनच गप्प व्हायची. नुसतीच गप्पगप्प रहायची.

गाववाल्यांनी, सग्यासोयऱ्यांनी दोघांची समजूत काढायचा खूप प्रयत्न केला. पण दोघंही आतल्याआत झुरत होते.. धोंडी सैरभैर झाला होता. त्याचं मनच ठिकाणावर नव्हतं.

एक दिवस धोंडी शेतात होता. पटकूर अंथरून पडला होता. आकाशाकडं एकटक बघत होता. इतक्यात शंकर तिथं आला. शंकर धोंडीच्या भावकीतलाच. जवळ जवळ त्याच्या

वयाचा. पण नात्यानं चुलत चुलता लागायचा. शंकर असा तसाच होता. तसं गोड बोलायचा. पण सतत काहीतरी उचापत्या करायचा. कुठून तरी चार पैसे मिळवायला बघायचा. पैसे हातात पडले की जायचा दारू प्यायला. स्वत:कडं पैसे नसले तर दुसऱ्याच्या पैशानं दारू प्यायचा. दुसऱ्याला गंडवावं कसं हे त्याच्याकडून शिकावं!

शंकर बसला धोंडीच्या शेजारी. त्याला खांद्यावर थोपटत म्हणाला, ''अरं लेका धोंडी, तू अजून जवान हायस की! कशाला काळजी करतूस. अजून पोरं व्हायचं वय हाय. चल उठ.''

धोंडी तरी हलेचना. शंकरनं त्याला पुन्हा पुन्हा समजावलं. मग हलक्या आवाजात त्याला म्हणाला,''धोंडी, खरं सांगू ? हे आसं पडून काय व्हयाचं न्हाई. तुझ्या मनाला दु:ख झालंय हे खरं. पन मानसाला अंगाला दुखलं, लागलं की त्याला दवापानी करतो की नाही? तसं दुख झालेल्या मनाला बी कायतरी दवादारू नगं व्हय? तेवढ्यासाठीच आसते ही'' असं म्हणून शंकरनं दारूची बाटली काढली. ''उठ मर्दा, घे जराशिक, बघ कशी तरतरी वाटंल.''

धोंडीच मन ठिकाणावर होतं कुठं? त्याच्या दुखऱ्या मनावर फुंकर घालायला कुणीतरी आलं यामुळंच त्याला फार बरं वाटत होतं. शंकरचा त्याला एकदम आधार वाटायला लागला. फारसा विचार न करता तो उठून बसला. शंकरनं पुढं केलेली बाटली घेतली. एक घोट घेतला.. आणि थोडीथोडी घेतच राहिला. दारू पिऊन हसला, मग धाय मोकलून रडला. पुन्हा घोट घेतला. शंकर त्याच्या पाठीवर थोपटत म्हणाला, '' घे धोंडी घे. अरं

दुखावर दारू हीच दवा. दुख दारूच्या आसपास फिरकूपण शकत नाही!''

थोड्या वेळानं धोंडी तिथंच लवंडला आणि झोपी गेला. शंकर निघून गेला.

धोंडी उठला तेव्हा रात्र झाली होती. नशा पूर्ण उतरली नव्हती. धोंडीरामला अस्वस्थ वाटत होतं. पुन्हा सगळी आठवण यायला लागली. रडू येऊ लागलं. तो धडपडत गावाच्या वेशीजवळ आला. जवळच्या गुत्त्यावर गेला. अर्धी बाटली दारू प्यायला. उठला. झोकांड्या खातखात घरी पोचला. अंगणात जोरदार ठेच लागून धपकन पडला. डोक्याला खोक पडली. सरला पळत बाहेर आली. जखमेवर तिनं पट्टी केली.

आधी तिला काहीच कळलं नाही. मग धोंडीचं बरळणं ऐकून तिला शंका आली. वासावरून खात्री झाली. धोंडीरामचं ते दारू पिणं बघून तिला अगदी एकटं वाटायला लागलं.ती हमसून हमसून रडू लागली. मुलगा मेल्यापासून ती रडतच होती. पण तिला थोडाफार धीर द्यायला धोंडी होता. आता तिला कोणाचा आधार होता?

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी शंकर आला. ''शेतावर दिसला न्हाईस''म्हणत घरात शिरला. धोंडीरामच्या डोक्यावरची पट्टी बघून म्हणाला, ''अरारा! ह्ये काय रं झालं'' मग त्यानं धोंडीच्या दंडाला धरून त्याला उठवलं. ''बरं, असू दे. यावर औषध त्येच.'' असं म्हणत त्याला घेऊन गुत्त्यावर गेला. दारू पिऊन रात्री कधीतरी उशीरा धोंडी परतला.

आणि मग रोज हे असंच सुरू झालं. दिवसा शेतावर, संध्याकाळी गुत्त्यावर. शंकर आणि धोंडीची जोडी जमली. धोंडीची आणि दारूची गट्टी जमली. छगन, किसन, विठू आणि अशाच मित्रांची टोळी जमली. पत्त्यांचा जुगार सुरू झाला. धोंडीराम दुःख विसरला. घरी यायचं पण विसरला. समोर सरला असायची पण तो तिलाही विसरला. सरलानं त्याला कितीदा सांगायचा प्रयत्न



केला. पण तो तिला धुडकावून लावायचा. पूर्वी तिच्यावर तो कधी ओरडायचा नाही. पण आता तिच्यावर हातही टाकायला लागला.

असेच दिवस जात होते. धोंडी पूर्वीसारखे शेतात कष्ट करेनासा झाला. थोडंफार काम करायचा. सोडून द्यायचा. सरलाच आता शेतात जास्त कष्ट करू लागली. तरी घरची मीठमिरची भागवायची कशी? मग ती इतरांच्या शेतावर मजुरी करायला लागली. धोंडीराम आज ना उद्या सुधारेल या आशेवर घर चाल-

वत होती. तिनं मजुरीतून मिळवलेले पेसैदेखील धोंडी काढून घ्यायचा. पण ती गप्प बसायची. कधी घाबरून. तर कधी तिला वाटायचं,धोंडीच्या कलानं घेतलं तर पुढं आपलं ऐकेल, सुधारेल.

पण धोंडीचं दारूचं व्यसन चालूच राहिलं. तिचे कष्ट वाढतच गेले. शेवटी तिनं पत्रानं मुंबईच्या दीराला कळवलं. गावात येऊन धोंडीरामला सुधारावं म्हणून विनवलं. उन्हाळ्याच्या सुट्टीत नक्की येतो असं दिराचं उत्तर आलं. मग मनीऑर्डरही आली. दीर अधूनमधून चार पैसे पाठवू लागला. सरलाला थोडा आधार मिळू लागला. पण...

संक्रात सरली आणि बातमी आली. मुंबईला गिरणी कामगारांचा संप सुरू झाला. महागाईचे दिवस. कामगारांना संसार चालवणं दिवसेंदिवस कठीण होत होतं. गिरणीमालक कापड गिरण्यांकडं दुर्लक्ष करत होते. दुसरे नवनवे कारखाने काढत होते. गिरणी कामगारांचा पगार वाढत नव्हता. कामगार संपावर गेले. संप महिनोन महिने चालू राहिला. सरलाचा दीरही संपावर होता. तो संघटनेच्या कामात गुंतला होता. संपातनं मार्ग निघेना. सरकार ढिम्म. मालक हट्टी. कामगार उघड्यावर पडले. शेवटी दीरानं मुंबईतच छोटीमोठी कामं करून पोटप्रपंच भागवायला सुरूवात केली.

अधूनमधून दिराकडून मिळणारी मदतही आता बंद झाली. त्याला गावाकडं यायलादेखील जमेना झालं. सरला पुन्हा एकटी पडली.

इकडं घरातल्या वस्तू अधूनमधून गायब व्हायला लागल्या. शेतातली बांधावरची झाडं एकेक करून नाहिशी व्हायला लागली.

धोंडीच्या दारू आणि पत्त्यापायी हे होतयं हे सरलाला कळत होतं. पण ती गप्प होती. खाल मानेनं येईल त्या परिस्थितीला तोंड देत होती. कष्ट करत होती. आला दिवस निभावून नेत होती. ती कधी अर्धपोटी राही, तर कधी उपाशीपोटी झोपी जाई.

सरलाला पुन्हा दिवस राहिले. पण पोटासाठी तिचे कष्ट चालूच होते. अतिकष्टानं ती आता सारखी आजारी पडत होती. मजुरी बंद पडली होती. उपासमार वाढत होती.

अशातच एक दिवस धोंडीची पत्त्यांवरून मारामारी झाली. त्यानं शंकरच्या डोक्यात काठी घातली. शंकरनं पोलीसात तक्रार केली. पोलीसांनी धोंडीला ठाण्यात दोन दिवस बंद ठेवला. गुरा-सारखा बदडला. इकडं त्या बातमीनं आणि उपासमारीनं सरला बेशुद्ध पडली. शेजारच्यांनी मदत केली म्हणून वाचली. धोंडीराम ठाण्यातून सुटून आला. आता त्याला पश्चाताप होत होता. शेजा-च्यांनी त्याला समजावला. सरलानं त्याला शप्पथ घातली. धोंडीनं दारूला पुन्हा शिवणार नाही अशी शपथ घेतली. सरलाला बरं वाटलं.

सरला बिचारी देवभोळी. धोंडीरामला घेऊन माळजाईच्या डोंगरावर गेली. तिथल्या देवीचं दर्शन घेतलं. तिला अडीचशेर तेल वाहिलं. असं केलं की दारू कायमची सुटते असं तिनं ऐकलं होतं. तिला खात्री होती की देवी आपल्या मदतीला धावून येणार. धोंडीरामची दारू कायमची सुटणार. आपला संसार पुन्हा उभा राहणार.

सरलाची यात फार ओढाताण झाली. दिवस भरण्याआधीच ती बाळंत झाली. पोर जन्मलं तेच मेलेलं. सरला पुन्हा खचली.

धोंडीराम खचला. त्याला पुन्हा दारू प्यायची इच्छा होत होती. पण समोर खंगलेली सरला दिसत होती. देवीची मूर्ती डोळ्या-समोर येत होती. गुत्त्याकडं न जाता तो घरीच राहीला. दारू प्यायची इच्छा दाबून तो काम करत होता. शंकरला आणि बाकी मित्रांना टाळत होता.

असेच थोडे दिवस गेले आणि गावात एक बातमी येऊन थडकली. जवळच नदीवर धरण होणार. गावात गडबड सुरू झाली. वर्दळ वाढली. सरकारी अधिकारी येऊ लागले. इंजिनिअर येऊ लागले. पाटबंधारे खात्याच्या जीप पळू लागल्या. कंत्राटदार मंडळी फिरू लागली.

कोणी म्हणू लागलं धरणात आपलं गाव बुडणार. कोणी म्हणालं गाव राहणार व बऱ्याच जणांच्या जमिनी बुडणार. कुणाच्या जमिनी बुडणार, कुणाच्या नाही? एकच गोंधळ उडाला. चर्चा सुरू झाल्या. चौकश्या सुरू झाल्या. असं कळलं की गावावरून मोठा रस्ता जाणार आहे. पण गावाच्या जमिनी काही बुडणार नाहीत. तरीपण कसलीच शाश्वती वाटंना. लोक हवालदिल झाले.

एक दिवस शंकर धोंडीकडं आला. म्हणाला, ''लेका किती केलं तरी येका रक्ताचं आपन. किती दिवस भांडत ऱ्हायचं? चल, झालं गेलं इसरून जाऊ. आमच्यासंगं तुला प्यायचं नसंल तर नगं पिऊस. पन जरा संसाराचा तरी इचार करशील? किती दिवस असाच हातातोंडाचा संसार रेटणार?''

धोंडीरामला आधी काहीच कळेना. शंकरनं त्याला सगळं नीट समजावलं. मग हळूहळू त्याला उलगडा झाला. धरण होणार हे पक्कं. फक्त आपली जमीन त्याखाली जाणार की राहणार

एवढाच आता प्रश्न आहे. लोकं काय, उलटसुलट बोलत राहाणार. त्यांच्यावर विसंबून कसं चालेल? समजा, जमीन धरणाखाली बुडणार. मग सरकारी दरानं काहीतरी नुकसान भरपाई मिळेल. ती किती असणार? ती मिळणार कधी? रोखीनं किती मिळणार आणि सरकारी कर्जरोख्याच्या रुपात किती? ते पैसे किती दिवस पुरणार?

आणि समजा, जमीन बुडणार नाही, असं धरलं. तरीपण आपली जमीन आहे उंचावर. धरणाचे कालवे निघणार पुढं. नदीच्या खालच्या अंगाला. आपल्याला काही कालव्याचं पाणी मिळणार नाहा. आपण रहाणार कोरडेठाक. असली बरड,कोरडी जमीन घेऊन किती दिवस बसणार? त्यापेक्षा आत्ताच आपणहून ही जमीन विकावी. रोखीनं. इथून मोठा रस्ता जाणार आहे. धरण होणार आहे.म्हणून काही मोठ्या पार्ट्यांना इथली जमीन पाहिजे आहे. रोख भरपूर पैसा ओतायला ते तयार आहेत. धोंडीरामची इच्छा असेल तर असं मोठं गिऱ्हाईक आणून आपण उभं करू असंही शंकर म्हणाला.

बोलता बोलता शंकरनं धोंडीरामला किती पैसे मिळतील तेही सांगितलं. त्यातून त्यानं गावात दुकान टाकावं. एक फटफटी घ्यावी. म्हणजे शहरातून स्वस्तात माल आणता येईल. धंद्यातही फायदा होईल असं स्वप्नही त्याच्या डोळ्यासमोर रंगवलं.

हे ऐकल्यापासून धोंडीरामच्या डोक्यात वेगानं चक्र फिरू लागली होती. किती दिवस असं दारिद्र्यात राहायचं, त्याला वाटलं. नाहीतरी दुसरा काहीच चांगला मार्ग दिसत नाही. ही सोन्यासारखी संधी का सोडायची? आता बडी गिऱ्हाईकं काय

रोज येणार आहेत? काय आपल्यासाठी वाट बघत थांबणार आहेत? आपल्याआधी बाकीच्यांनी जमिनी विकल्या तर? मग आपल्याला चांगलं गिऱ्हाईक देखील मिळणार नाही. त्यानं मनाशी पक्का निर्णय केला. जमीन विकायचीच.

इकडं शंकरनं मुंबईला पत्र टाकलं. धोंडीरामचा भाऊ आला. त्याची परिस्थिती तंगीचीच होती. मुंबईत छोटा धंदा करायचा म्हटलं तरी पैसे पाहिजेत. गावातल्या जमिनीचा त्याला काय उपयोग हे शंकरचं म्हणणं त्याला पटलं. सगळ्यांनी मिळून जमीन विकायची ठरवलं. त्या सगळ्यांची घाई सरलाला पटत नव्हती. घाईघाईनं जमीन विकू नये असं तिला वाटत होतं. पण अशा व्यवहारात बाईमाणसाला काय कळतं? असंच पुरुष मंडळी म्हणणार हे सरलाला ठाऊक होतं. म्हणून ती गप्प राहिली.

मुंबईतल्या चपलांच्या व्यापाऱ्यानं जमीन घेतली. पैसे आले. वाटण्या झाल्या. आणि धोंडीरामचं आयुष्य बदललं. घरात चार छानछोकीच्या वस्तू आल्या. सरलाला, त्याला झुळझुळीत कापडं आली. त्याच्या हातात चकाकणारं घड्याळ आलं. बोटात अंगठी आणि गळ्यात सोन्याची साखळी आली. फिरायला फटफटी आली. सरलाला दागिने मिळाले.

धोंडीराम गाडी घेऊन फिरू लागला. तोंडात पान नाहीतर सिगारेट. खिशात गुटक्याची पाकीटं. दिवसभर लॉटरीच्या दुकानावर, सगळा वेळ लॉटरी खेळण्यात जाऊ लागला. संध्याकाळी विलायती दारूबरोबर गप्पा रंगू लागल्या. शंकरबरोबरची उठबस वाढली.

सरलाची मोलमजुरीतून सुटका झाली. तीही खूष होती.

धोंडीरामनं एक किराणा दुकान सुरू केलं. त्याला वेळ कुठं होता तिकडं लक्ष द्यायला? लॉटरी आणि दारूत तो पूर्ण बुडाला होता. सरलाला दुकान चालवण्याच्या खाचाखोचा ठाऊक नव्हत्या. ती तरी काय करणार? जमीन विकून आलेले पैसे बघता बघता संपून गेले.

हळूहळू दुकान बंद पडलं. फटफटी विकली गेली. दागिने गहाण पडले. घरातल्या किमती वस्तू एकेक करून नाहीशा होऊ



लागल्या. धोंडीराम देणेकरी बनला. लोकांची तोंडं चुकवू लागला.

रात्री उशीरा घरी परतू लागला. तेही प्यालेल्या अवस्थेत. सरलाला शिवीगाळ, मारहाण करू लागला.

सरलाचे हाल पुन्हा सुरू झाले. दातावर मारायला पैसा मिळेना. पन्हा उपासमार सुरू झाली. ती मजुरीला जाते असं कळलं की धोंडीराम खवळायचा. आपल्या इज्जतीला शोभत नाही म्हणायचा. तरी ती धडपडायची, कामं शोधायची. पण ती परत आजारी पडू लागली. त्यातच तिला दिवस गेले. मग तिचे हाल कुत्रं खाईना. शेवटी तिसऱ्या पोराला जन्म देताना ती वारली. पुढं दोन दिवसांनी पोरही दवाखान्यात वारलं. धोंडीराम रडरड रडला. लोकांना मात्र तो नाटक करतोय असंच वाटलं.

सरला घरात होती तोवर धोंडीराम निर्धास्त होता. ती गेली आणि घर त्याला खायला उठलं. सरला गेल्यावर तो दहापंधरा दिवसदेखील थांबला नाही. त्यानं घर विकून टाकलं. दिवस रात्र दारूच्या नशेत राहू लागला. पारावर नाहीतर देवळाच्या ओट्यावर पडून राहू लागला. त्याच्याजवळ पैसे होते तोवर शंकर आणि मित्र उठबस करत होते. एके दिवशी त्याच्याजवळचे पैसे चोरीला गेले. तो पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवायला गेला. पण पोलीसांनी दोनचार फटके लावले आणि त्याला हाकलून दिलं.

त्याच्याकडं पैसे होते तेव्हा त्याला धोंडीरामशेठ म्हणत. आता लोक त्याला टाळू लागले. उधारीवर कणभर चहादेखील मिळेनासा झाला. शंकर आणि मित्र तर जणू गायबच झाले. तो मोलमजुरीसाठी गेला तरी लोक तोंड फिरवू लागले. हा दारूडा काय काम करणार असं म्हणू लागले. धोंडीरामची अवस्था भिकाऱ्यासारखी झाली. फुटकळ काम करून दोन चार रुपये मिळाले

तरी तो दारू प्यायचा. कुठंतरी पडून राहायचा.

एके काळी भला माणूस असलेला धोंडीराम. त्याची काय अवस्था झाली? त्याला पुन्हा माणसात आणला पाहिजे असं वाटणारी दोन चार माणसं होती. त्यात गावाच्या शाळेतले एक-दोन शिक्षक होते. तरूणमंडळाचे दोन चार कार्यकर्ते होते. ज्ञान-विज्ञान समितीचे कार्यकर्ते होते. त्यातले काहीजण धोंडीशी बोलले. त्यानं नीट वागायचं कबूल केलं. मग त्याच्यासाठी ते नोकरी पाहू लागले. तो इतका अशक्त झाला होता की अंगमेहनतीचं काम त्याला शक्य नव्हतं. शेतीकामाशिवाय दुसरं कसब त्याच्याकडं नव्हतं.

शेवटी त्याला राखणदाराची नोकरी लोकांनी मिळवून दिली. कुठं? पूर्वी जिथं त्याचं शेत होतं त्या जमिनीवर. त्या सगळ्या भाऊबंदांची जमीन मुंबईच्या चप्पल कारखानदारानं घेतली होती. तिला लांबलचक कुंपण घातलं होतं. आत एक बंगला बांधला होता. त्याला फार्म हाऊस म्हणायचे. काही भागात फळझाडं लावली होती. काही भागात निलगिरी होती. जमिनीचा मोठा पट्टा सागवानाच्या रोपांनी व्यापला होता. एक छोटी खोली बांधून त्यात मोठा पंप बसवला होता. तिथून निघणारी पाईप लाईन थेट खाली जात होती. धरणाच्या साठ्यातलं पाणी थेट उचलून वर आणा-यला. पाहिजे तेव्हा पाहिजे तेवढं पाणी उचलून घेतलं जायचं. बाजूलाच मोठमोठे, लांबलचक पिंजरे बांधले होते. त्यात हजारो कोंबड्या पक् पक् करत असायच्या. जवळच मॅनेजरचं घर होतं. पोल्ट्रीवर काम करणारे चार दोन कामगार तिथंच राहायचे. बाकीचे रोज बाहेरून यायचे.

मुंबईहून साहेबांच्या दोन तीन गाड्या कधीतरी धूळ उडवत यायच्या. साहेब एखादी चक्कर मारायचे. बंगल्यात एखादा दिवस विश्रांती घ्यायचे. परत जायचे. धोंडीरामचं काम होतं तिथलं फाटक सांभाळायचं. दिवसभर बसायचं. रात्री फाटक बंद करून तिथंच झोपायचं. पूर्वी धोंडी याच जमिनीवर झोपायचा पटकूर अंथरून.. पण तो मालक होता. स्वत:च्या कष्टानं शेत पिकवत होता. हिरवी, डोलणारी रोपं प्रेमानं कुरवाळत होता. आता तिथं तो झोपत होता एक नोकर म्हणून. त्याच्या जमिनीवर दुसऱ्यानं उभारलेल्या संपत्तीचा रखवालदार म्हणून!

नोकरी राहावी म्हणून तो जरा नीट राहात होता.शिक्षक आणि कार्यकर्ते त्याच्यावर लक्ष ठेवून असायचे. तो दिवसा ढवळ्या दारू पीत नव्हता. पण रात्री झोपताना त्याला सगळं आयुष्य आठवायचं. आपल्याच जमिनीवर आपण नोकर झाल्याची बोच त्याला लागायची. दु:खानं आणि निराशेनं त्याचं डोकं गरगरायचं. मग ते सारं विसरायला तो आणखी दारू प्यायचा.

धोंडीरामची जमीन गेली. मुलं गेली. बायको त्याची साथ सोडून गेली. पण दारू? ती मात्र त्याची कायमची सोबतीण झाली होती. जळवेसारखी त्याला चिकटली होती. त्याचं रक्त शोषत होती. त्याचा सत्यानाश करत होती. धोंडीराम दारूचा गुलाम बनून जगत होता. आपल्याच जमिनीवर आपण नोकर बनलो याची शरम त्याला वाटत होती. पण दारूचा गुलाम बनल्याची लाज मात्र त्याला वाटत नव्हती. काळ असाच चालला होता. धोंडीराम दारूच्या सोबतीनं जगत होता. दारूच्याच नशेत, तिच्याच कुशीत आपण मरणार अशीच त्याची कल्पना होती,नव्हे तशी त्याची खात्रीच होती.

पण गावात धरणामुळं उठलेली धूळ केव्हाच खाली बसली होती. रस्त्यांवरून धावणाऱ्या गाड्यांची धूळ उठत होती आणि खाली बसत होती. गावाच्या विकासाच्या नावानं उडालेली धूळ खाली बसली. चारदोन मालदार बनले तर पाचपन्नास कंगाल झाले. मोठ्या आशेनं शहरात गेले ते झोपडपट्टीत जमा झाले. उरलेले गावातच मोलमजुरीसाठी धडपडू लागले.



आणि अशातच गावात साक्षरतेचं वारं येऊन थडकलं. साक्षरतेच्या घोषणांनी घरादारांच्या भिंती रंगल्या. फेऱ्या निघाल्या. पोरं गाणी म्हणू लागली. शहरातून चार दोन जण अधूनमधून येऊ लागली. शाळेतली पोरं उत्साहानं धावपळ करू लागली. शाळेतले चारदोन शिक्षक मनापासून काम करू लागले. उरलेली सरकारी मंडळी नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे काम केल्यासारखं दाखवू लागली.

गावातली या सगळ्या प्रकाराकडं आपला काय संबंध या नजरेनं बघू लागली. काहींनी तर ढुंकूनदेखील बघितलं नाही. काही मंडळींना चकाट्या पिटायला नवा विषय मिळाला. काही मंडळी या साक्षरतेची टिंगल करत आपला वेळ कारणी लावू लागली. पण गावातली तरूण पोरं कामाला लागली. बायाबापड्यांनी शिकायचं मनावर घेतलं. साक्षरतावर्ग सुरू झाले. त्यात पुरुष थोडे पण बायका जास्त. शेतातली व घरातली कामं सांभाळून अक्षरं गिरवू लागल्या. गाणी म्हणू लागल्या. एकत्र येऊन सुखदु:खाच्या चार गोष्टी बोलू लागल्या. कधी घराच्या, कधी गावाच्या. शिकता शिकता पुस्तकातल्या एका धड्याजवळ सगळ्या अडल्या. धडा होता दारूबद्दलचा. दारूनं संसाराचं वाटोळं कसं होतं. पुरुष हैवान कसे होतात. ह्यात पोराबाळांचा बळी कसा जातो. बाई कशी भरडली, तुडवली जाते. आणि त्या धड्यात पुढं असंही होतं की त्या गावात बायका एकत्र येतात. दारूला हद्दपार करायचं ठरवतात. आणि दारूचे गुत्ते त्या उधळून लावतात. दारू पिणाऱ्या पुरुषांना रोखतात,समजावतात. नाहीतर अद्दल घडवतात. दारूड्या पुरुषांना गावात राहाणं मुश्कील करतात.

धडा वाचून साक्षरता वर्गातल्या काही बायका पेटल्या. त्यांना वाटलं आपणही असंच का करू नये? इतरांशी त्या बोलल्या. तरूण मंडळाशी बोलल्या. शेतकरी, शेतमजूर, संघटनेच्या कार्यकर्त्यांशी त्या बोलल्या. आणि गावात एक आंदोलन उभं राहिलं. दारूबंदी आंदोलन. मदतीला आधी पोलीस तयार नव्हते. फौज-

दाराला बायकांनी घेराव घातला. मग तेही तयार झाले.

धोंडीरामची आता झाली पंचाईत. गावातले गुत्ते बंद पडले. दारू मिळेना. त्याची तगमग होऊ लागली. दोन तीन दिवस त्यानं कळ काढली. शेवटी त्याला अगदीच राहवेना. तेव्हा एका संध्याकाळी तो हळूच शेजारच्या गावाला गेला. दारू पिऊन तिन्हीसांजेला परतला.

पण त्याला काय कल्पना? दारूबंदी आंदोलनाच्या कार्यकर्त्या बायका डोळ्यात तेल घालून उभ्या होत्या ते? तरूण मंडळाची पोरं वासावरच होती. गावात शिरताच धोंडीला सगळ्यांनी घेरला. त्याच्या गळ्यात पाटी अडकवली 'मी दारू प्यायलो आहे' आणि गावातनं त्याची मिरवणूक काढली- अगदी वाजतगाजत. धोंडीरामला शरमेनं मेल्यागत झालं. आयुष्यात कधी वाटली नव्हती एवढी लाज वाटली त्याला. पोलीसांचा मार शंभरदा परवडला, पण असा अपमान नको असं त्याला वाटलं. शेवटी लोकांनी त्याला सोडून दिलं. तेव्हा पोल्ट्री फार्मच्या एका बंद खुराड्यात जाऊन तो रड रड रडला.

दुसरे दिवशी संध्याकाळी कार्यकर्ते त्याला भेटायला आले. त्याला म्हणाले, ''राग धरू नकोस. तू स्वत:च्याच आयुष्याचं कसं मातेरं केलंस ते बघ. आता स्वत:ला सुधार. इतरांना तुझी कहाणी सांग. आणि त्यांना दारूपासून परावृत्त कर. तू असं केलंस तर लोक तुला पूर्वीसारखाचं भला माणूस म्हणून ओळखतील. पुन्हा तुला मान द्यायला लागतील.''

धोंडीरामच्या डोळ्यात पाणी तरळलं. लोकांची आपुलकी बघून त्याचं काळीज हललं. तो बोलला नाही. पण त्यानं मनोमन

निश्चय केला. आता दारूला स्पर्श करायचा नाही. तो म्हणाला, ''



विचार करतो. पण तुमच्याबरोबर मला काहीतरी करायला आवडेल.''

शेतमजूर संघटनेचा कार्यकर्ता म्हणाला, ''तू आमच्याबरोबर रहा. तू बेघर आहेस. आपण बेघरांना घरं मिळावीत म्हणून प्रयत्न करू या. स्वत:च्या घराबरोबर इतरांची घरं उभी करू या.''

साक्षरता वर्ग घेणारी महिला कार्यकर्ती पुढं आली. म्हणाली, ''धोंडीराम, तू दारू सोड. आमच्याबरोबर राहा. तुझ्यासाठी चार भिंतीचं घर तर मिळवूच. पण खरंखरं घर उभं करू. तू पुन्हा लग्न कर. सरलाचे हाल तुझ्यामुळे झाले ना? त्याची भरपाई तू कशी करणार? मी सांगते ऐक. एखादी कष्टाळू, सरळ बाई बघ. मस्तवाल नवऱ्यामुळं उध्वस्त झालेल्या कितीतरी बायका आहेत. त्यातली एखादी कष्टाळू, सरळ बाई बघ. तिला तू आधार दे. तिचा आधार तुला मिळेल. तू नीट राहिलास तर तुमचं घर, तुमचा संसार पुन्हा उभा राहील.''

आता मात्र धोंडीरामला हुंदका आवरला नाही. काही न सुचून डोळे पुसत तो उभा राहिला. सावंत गुरूजीना त्याच्या पाठीवर थोपटलं. ते म्हणाले, ''तुझं मन साफ झालं. यातच सगळं आलं. चल''

आणि धोंडीराम त्या सगळ्यांबरोबर बाहेर पडला. आता कुठं जायचं हे त्याला नेमकं कळलं होतं.

*****